दूरध्वनी - ०२२ २२६९१३६०
०२२ २२६११७२२
ईमेल - १) raamumbai@maa.ac.in
२) ivgsmumbai@gmail.com

मार्गदर्शनं परमं ध्येयम्

महाराष्ट्र शासन

# प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई

(व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था)

३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

जा.क्र./ प्राविप्रा मुंबई/शिक्षक अधिकारी स्पर्धा/ २०२५-२६/ ६०७-ब दि. ०३/११/२०२५

सुधारित पत्र (केस स्टडी)

प्रति

१)मा. उपसंचालक प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व)

२) मा. प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)

३) शिक्षणाधिकारी प्राथमिक (सर्व)

४) शिक्षणाधिकारी माध्यमिक (सर्व)

५) शिक्षण निरीक्षक (दक्षिण, पश्चिम व उत्तर विभाग मुंबई)

६) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती ( सर्व)

७) प्रशासन अधिकारी, मनपा , नपा (सर्व)

विषय - शिक्षक व अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्याबाबत...

संदर्भ १) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०

२) राज्य अभ्यासक्रम आराखडा -२०२४

३) मा. संचालक ,राशैसंप्रप/शिक्षक स्पर्धा / २०२५ - २६/१४९०२७३दि. १०-१०-२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयांवर राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी DIET मधील अधिकारी कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे त्यांच्यात समन्वय सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका जिल्हा व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा ह्या एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहे. नमूद स्पर्धेचे निकष व नियमावली बाबतचे सविस्तर माहिती

**"शिक्षक अधिकारी कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका"** या पुस्तके देण्यात आलेली आहे. शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांनी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे या संस्थेच्या www.maa.ac.in 'उपयुक्त 'या टॅब वर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन २०२५ -२६ वर्षापासून एकूण ४३ स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व प्रादेशिक विद्या प्राधिकरण व DIET कडून आयोजित करण्यात येणार आहे. याबाबत संबंधित DIET व RAA कार्यालयाकडून मार्गदर्शक सूचना पत्र दिले जाणार आहे. त्यानुसार तालुका/ यु आर सी स्तरावर स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.

वरील ४३ स्पर्धांपैकी बाल मानसशास्त्र केस स्टडी स्पर्धा आयोजनाची जबाबदारी प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई यांच्या कडे देण्यात आली आहे. त्यानुसार बाल मानसशास्त्र केस स्टडी स्पर्धा आयोजना बाबतच्या सूचना - संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रानुसार नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी म्हणजेच १५/११/२०२५ रोजी बाल मानसशास्त्र केस स्टडी स्पर्धा प्रत्येक तालुका स्तरावर घेण्याचे नियोजित आहे. त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) स्पर्धेसाठी नाव नोंदणीसाठी जिल्हा /राज्य यांच्याकडून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.

२) केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी लिंक वर नोंदवावे.

३) प्रत्येक स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकांनी सहभाग घेणे बाबत प्रोत्साहित करण्यात यावे.

४) स्पर्धानिहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची/ शिक्षकाची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकांकडे सादर करावी .

५) सर्व स्पर्धांसाठी तालुकास्तरावर सहभाग घेणारे शिक्षक अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्म द्वारे संकलित केले जाईल.

६) केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविले जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे.

७) दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

८) तालुका स्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.

९) या स्पर्धेची तयारी करण्यासाठी कोणते प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाची नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०) तालुकास्तरीय स्पर्धांची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी/सहाय्यक शिक्षण निरीक्षण/विस्तार अधिकारी प्रशासकीय अधिकारी यांची राहील. गटशिक्षणाधिकारी/ प्रशासकीय अधिकारी / सहाय्यक शिक्षण निरीक्षक यांनी तालुकास्तरीय समितीच्या मदतीने या स्पर्धा विहित वेळेत पार पाडाव्यात.

११) तालुकास्तरीय स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकांची नावे अंतिम करून प्रादेशिक विद्या प्राधिकरणकडे /DIET कडे दि.३१/१०/२०२५ पर्यंत पाठवावी. तसेच स्पर्धेची ठिकाणे कळवावीत.

१२) तालुका समितीच्या बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी. तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी/ सहाय्यक शिक्षण निरीक्षक/विस्तार अधिकारी/प्रशासकीय अधिकारी यांनी तर विभाग स्तर व राज्यस्तर स्पर्धांचे आयोजन संबंधित प्रादेशिक विद्या प्राधिकरण / जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांनी एस सी ई आर टी पुणे कडील नियोजनानुसार करावे . याबाबत आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे. प्रत्येक स्पर्धेसाठी तीन परीक्षकाची निवड करण्यात यावी. परीक्षकासाठी एससीईआरटी पुणे कडून निधी प्राप्त झाल्यानंतर स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारित मानधन देण्यात येईल.

(मनिषा पवार)
प्राचार्य
प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई

सोबत

१) संभाव्य स्पर्धा नियोजन /आयोजन

२) शिक्षक व अधिकारी कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका

३) बाल मानसशास्त्र केस स्टडी स्पर्धा नियमावली

प्रत माहितीस्तव सविनय सादर,

१. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

२. मा. शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई.

# बाल मानसशास्त्र केस स्टडी स्पर्धा

## स्पर्धेचा उद्देश

दैनंदिन जीवनात विद्यार्थी अनेक समस्यांना सामोरे जात असतात. या समस्यांचा मानसशास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करून त्या कशा दूर करता येईल यासाठी शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचारी, अधिकारी प्रयत्न करताना दिसतात. त्यात अनेकांना यश देखील प्राप्त झालेले आहे.

अशा यशस्वी केस स्टडी सर्वांसमोर येण्यासाठी बाल मानसशास्त्र (child psychology) विषयाअतंर्गत

केस स्टडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

## उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांच्या विविध वर्तन विषयक समस्यांची जाणीव होऊन त्यावरील उपाय योजना समजून घेणे.

२) सोशल मीडियाचा मानसिक आरोग्यावरील परिणाम व त्यावरील उपाय योजना समजून घेणे .

३) विद्यार्थी सुरक्षिततेसाठी केलेल्या उपाययोजना समजून घेणे .

४) भाषिक व गणितीय संबोध स्पष्ट न होण्यामागील मानसशास्त्रीय अडथळे व त्यावरील उपाय योजनांची माहिती घेणे.

५) शिक्षण विभागातील सर्व शिक्षक कर्मचारी व अधिकारी यांना बाल मानसशास्त्रातील केस स्टडी ऑनलाइन उपलब्ध करून देणे.

## सहभागी स्पर्धक -

१)सर्व प्रकारचे व्यवस्थापन व माध्यमाच्या शाळेतील प्राथमिक, माध्यमिक स्तरावरील शिक्षक, मुख्याध्यापक तसेच शिक्षण विभागातील प्रशासन व सक्षमीकरण शाखेतील अधिकारी व कर्मचारी.

## स्पर्धेचे विषय

१) विद्यार्थ्यांच्या वर्तन विषयक समस्या व त्यावरील उपाय.

२) सोशल मीडियाचा मानसिक आरोग्यावरील परिणाम.

व त्यावरील उपाय योजना.

३) विद्यार्थी सुरक्षिततेसाठी केलेल्या उपाययोजना.

४) भाषिक विकासातील मानसशास्त्रीय अडथळे व त्यावरील उपाय.

५) गणितीय संबोध विकासातील मानसशास्त्रीय अडथळे व त्यावरील उपाय.

**स्पर्धेचे नियम**

१) राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अनुदानित ,अंशतः अनुदानित ,प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी ,कर्मचारी स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात.

२) केस स्टडी सादर करताना ती स्वतः प्रत्यक्ष राबविलेली असावी. त्यासाठी स्पर्धकाने स्वघोषित प्रतिज्ञापत्र सादर करावे.

३) स्पर्धकांना संबंधित विषयात नमूद केलेल्या कोणत्याही एका घटकासाठी सहभाग नोंदविता येईल.

४) सदर केस स्टडी ही यापूर्वी कुठेही सादर केलेली नसावी.

५) केस स्टडी ही सन २०२४ -२५ किंवा २०२५ -२६ या कालावधीमध्ये राबविण्यात आलेली असावी.

६) बाल मानसशास्त्र विषयावरील केस स्टडी स्पर्धेकरिता दिलेल्या घटकांपैकी कोणत्याही एका घटकावर २००० शब्द मर्यादेत केस स्टडी असावी .

७) केस स्टडी अहवाल टाईप केलेला असावा. टायपिंग साठी Unicode या फॉन्टचाच वापर करावा. फॉन्ट साईज १२,पेज मार्जिन डावी बाजू १.५ इंच व उजवी बाजू तसेच खालच्या बाजूस प्रत्येकी एक इंच मार्जिन समास असावी.

९) केस स्टडीचे मराठी किंवा इंग्रजी यापैकी कोणत्याही एका भाषेत लेखन करावे.

१०)निवडलेल्या विषयावर १० ते १२ स्लाईडची पीपीटी तयार करावी.

११)सादरीकरणाकरिता प्रत्येक स्पर्धकाला १०मिनिटांचा अवधी देण्यात येईल.

१२)स्पर्धकानी केस स्टडीच्या ३ प्रती हार्डकॉपी स्वरूपात सोबत आणाव्यात.

१३) सदर स्पर्धा ही तालुका, विभाग व राज्यस्तरावर घेण्यात येणार आहे.

१४) तालुकास्तरावर ही स्पर्धा उपरोक्त सूचनांप्रमाणे घेऊन प्रत्येक तालुक्यातील प्रथम क्रमांकाची केस स्टडी विभाग स्तरावरील केस स्टडी स्पर्धेसाठी सहभागी होण्यास पात्र ठरेल.

१५)प्रति तालुका एक याप्रमाणे विभाग स्तरावर स्पर्धा घेण्यात येईल. या स्पर्धेमधून प्रथम ५ क्रमांक काढावेत. विभाग स्तरावरील प्रथम ५ क्रमांकाचे विजेते राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेण्यासाठी पात्र ठरेल.

१६)सदर स्पर्धेचे मूल्यांकन प्रत्येक स्तरावरील गठीत परीक्षण समितीमार्फत करण्यात येईल स्पर्धेत सहभागी असलेल्या व्यक्तीला परीक्षण समितीमध्ये घेण्यात येऊ नये. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

१७)स्पर्धांचे निकष नियमावली सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. सदर पुस्तिका www.maa.ac.in या संकेतस्थळावर 'उपयुक्त' या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

१८)केस स्टडी स्पर्धा खालील प्रमाणे ३ स्तरावर आयोजित करण्यात येईल.

१} तालुकास्तर स्पर्धा माहे नोव्हेंबर ( दुसरा शनिवार)

२} विभागस्तर स्पर्धा माहे डिसेंबर ( दुसरा शनिवार)

३} राज्यस्तर स्पर्धा माहे जानेवारी (दुसरा शनिवार)

१९)सर्व स्पर्धांसाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक ,अधिकारी ,कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्म द्वारे संकलित केले जाईल. हा गुगल फॉर्म एस.सी.ई.आर.टी .पुणे यांच्यामार्फत पत्राद्वारे कळविण्यात येईल. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत केंद्रप्रमुखांपर्यंत हा गुगल फॉर्म पाठवण्यात येईल .केंद्रप्रमुख यांच्यामार्फत सर्व स्पर्धकांची माहिती गुगल फॉर्म मध्ये नोंदविण्यात यावी.

२०) स्पर्धेत सहभागी होणाऱ्या अधिकारी /कर्मचारी यांचे कार्यालयाचे ठिकाण ज्या तालुक्यात/ ब्लॉक मध्ये आहे, त्याच तालुक्यामध्ये त्यांची नोंदणी होईल. तेथे तालुका स्तरावर स्पर्धा करतील, त्यांच्यासाठी केंद्र स्तरावरील निवड प्रक्रिया होणार नाही. त्यांची नोंदणी शिक्षकांपासून पूर्णपणे स्वतंत्र असेल. परंतु स्पर्धा समान असेल ते त्या तालुक्यामधील शिक्षकांसोबतच स्पर्धा करतील.

२१) प्रत्येक केंद्रातून किमान एक शिक्षक या स्पर्धेला सहभागी होईल या दृष्टीने प्रत्येक केंद्रप्रमुखांनी स्वतः शिक्षकांकडून माहिती घेऊन ही लिंक भरावी.

२२) तालुकास्तरावरील स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावर स्पर्धेसाठी पात्र राहील.

२३) विभाग स्तरावरील प्रथम ५ क्रमांकाचे विजेते राज्यस्तरावर सहभागासाठी पात्र राहतील.

२४) राज्यस्तरावरील स्पर्धेचे आयोजन प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई यांच्यामार्फत करण्यात येईल. त्याबाबतचे नियोजन स्वतंत्ररीत्या पत्राद्वारे कळविण्यात येईल.

**केस स्टडी(व्यक्ती अभ्यास) लेखनाचे आवश्यक मुद्दे**

१) केस स्टडी चा विषय - नेमका विषय लिहावा

२)समस्येची पार्श्वभूमी- समस्या निवडण्यामागचे कारण स्पष्ट करावे. यापूर्वी यावर काही कार्य झाले असल्यास त्याचा उल्लेख यात करावा.

३)व्यक्तीअभ्यासाचे (केस स्टडी) उद्दिष्टे: यामध्ये केस स्टडी करण्याचे कारण? या केस स्टडीचा कोणाला, कसा व कोणत्या स्वरूपात फायदा होणार? या बाबी स्पष्ट करणारे ३-५ विधानात्मक उद्दिष्टे मांडावीत.

४)कार्यवाहीचे टप्पे:

१} समस्येची जाणीव, स्वरूप व निरीक्षणे

२} संबंधित व्यक्तींशी ,तज्ञांशी चर्चा

३} आवश्यक साधनांचा विचार

४} करावयाच्या कृतींचा क्रम

५} समस्या निराकरण नंतरचे निरीक्षण

५) कार्यवाहीचे वेळापत्रक

६) इतरांची मदत

७) केस स्टडी करिता वापरलेले साधन - निरीक्षण, प्रयोग सरंचित मुलाखती, प्रश्नावली, माहितीपर विश्लेषण.

८)केस स्टडीचे वैशिष्ट्य /वेगळेपणा - विषयाशी संबंधित, नेमकेपणाने , नाविन्यतेला धरून असावे.

९)गोपनीय दस्ताऐवज- समस्या निराकरणाकरता उपयोगात आणलेल्या गोपनीय दस्तऐवजांचा समावेश यात असेल.

१०)उपाय - समस्या निराकारणाकरिता केलेले उपाय ठळकपणे यात मांडावेत. सदर उपाय हे उद्दिष्ट साध्य करणारे असावेत.

११) विमर्श चिंतन- व्यक्ती अभ्यास (केस स्टडी) मधून आपण काय शिकलो. याबद्दल नेमकेपणाने माहिती लिहावी.

१२)आवश्यकतेनुसार चार ते पाच फोटोचा समावेश केस स्टडी मध्ये योग्य ठिकाणी करू शकता.

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री/श्रीमती ............

प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या केस स्टडी स्पर्धेसाठी

सादर केलेला---------------------------------------

व्यक्ती अभ्यास माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमावर, अनुभवावर आधारित आहे.सदर केस स्टडी ही काल्पनिक नाही. भारतीय अथवा विदेशी लेखकाच्या ग्रंथातील अथवा संशोधनाच्या माहितीच्या आधारे ही केस स्टडी लिहिलेली नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. ही केस स्टडी यापूर्वी कोणत्याही स्पर्धेसाठी सादर केलेली नाही.

तसेच ही तर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन ती माझ्या नावावर सादर केलेली नाही. तसे आढळून आल्यास Copyright Act १९५७ खाली दाखल पात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव----------------------

शाळा/कार्यालयाचा शिक्का

दिनांक-

स्थळ -

-----------------------------------------------------------------

**मूल्यमापन-**

व्यक्ती अभ्यास( केस स्टडी)

- अभ्यासाचे सादरीकरण- गुण १५
- उद्दिष्टातील स्पष्टता -१०गुण
- उपायांमधील नाविन्यता -१०गुण
- नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही -२५ गुण
- मानसशास्त्रीय दृष्टिकोनावरील प्रभुत्व -१० गुण
- अभ्यासाचे वर्तमान काळातील महत्त्व-१०गुण
- अहवाल लेखन -२०
- एकूण गुण -१००

Manwar

प्राचार्य
प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई